प्रेसनोट दि.२०/०७/२०१८

## ओएलएक्स वेबसाईटवर ऑनलाईन फोरव्हिलर विकण्याच्या बहान्याने आर्थिक फसवणूक करणारा कांगो नागरिक सायबर क्राईम सेलच्या जाळ्यात.

ऑनलाईन खरेदी-विक्री करण्याऱ्या वेबसाईटवर विवीध फोर व्हिलर विक्री संदर्भातील अनेक जाहीराती अपलोड करून नागरिकांकडून पैसे उकळण्याच्या प्रकारामध्ये वाढ होत आहे. दाखल गुन्ह्यातील फिर्यादी यांनी फोर व्हीलर ही गाडी घेण्यासाठी इंटरनेटवर सर्फीग करीत असताना ओएलएक्स या खरेदी-विक्री या वेबसाईटवर मारुती सुजूकी इर्टीका या गाडीची जहिरात दिसून आली. फिर्यादी यांनी सदर जहिरातीमध्ये संपर्कासाठी नमुद करण्यात आलेल्या मोबाईल नंबरवर कॉलींगव्दारे संपर्क केल्यानंतर अज्ञात व्यक्तीने फिर्यादी यांना पैसे जमा केल्यानंतर मारुती सुजूकी इर्टीका या गाडीची डिलीव्हरी करण्यात येईल असे सांगितले. फिर्यादी यांना मारुती सुजूकी इर्टीका ही गाडी विकत घेण्यासाठी अज्ञात व्यक्तीने रक्कम रु. २,७७,४००/- हे जमा करण्यास भाग पाडले. फिर्यादी यांची आर्थिक फसवणूक केली असल्याने हिंजेवाडी पोलीस ठाणे गु.रं.नं. ३३५/२०१८, भा.द.वि. कलम ४१९,४२० सह माहिती तंत्रज्ञान सुधारित कायदा २००८ चे कलम ६६सी, ६६ डी, प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

यातील फिर्यादी यांनी सायबर क्राईम सेल येथे झालेल्या आर्थिक फसवणूकीबाबत तक्रार केली होती. मा. पोलीस उप आयुक्त, आ.व.सा., गुन्हे, मा. व.पो.नि. राधिका फडके यांच्या मागदर्शनाखाली दाखल गुन्ह्याचा समांतर तपास हा सायबर क्राईम सेल, गुन्हे शाखा करीत असून सायबर सेलच्या पथकाने त्वरीत संबधित मोबाईल कंपनी व बँक यांना पत्रव्यवहार करून त्यांचेकडून माहिती प्राप्त केली. मोबाईल कंपनी व बँकेकडून प्राप्त माहितीचा तांत्रिक अभ्यास करून आरोपी हे बेंगलोर येथे असल्याचे निष्पन्न केले. त्या अनुशंगाने मा. पोलीस आयुक्त, आ.व.सा., यांच्या परवानगीने बेंगलोर येथे पथक रवाना करण्यात आले. सदर ठिकाणी जावून आरोपी नामे - Nyanguile Kishi Patient रा- सेक्टर १, बी क्रॉस, बेराठी बंडे, बैंगलोर कर्णाटक (मुळ- कांगो) येथून याना ताब्यात घेतले. त्याच्याकडुन ०७ मोबाईल हॅन्डसेट, ०१ पेनड्राईव्ह, ०१ हार्डडिक्स व रक्कम रु...९,५०० ही रोख रक्कम हे जप्त करण्यात आले आहे. सदर आरोपींस ताब्यात घेवून पुढील कारवाईसाठी हिंजेवाडी पोलीस ठाणे यांच्या ताब्यात देण्यात आले आहे. त्याचेकडे करण्यात तपासामध्ये पुणे शहरा व त्या व्यक्तीरिक्त महाराष्ट्रातील अनेक लोकांना अशा प्रकारे फसवणूक करून आर्थिक फसवणूक केली असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

सदरची कारवाई ही श्री. पंकज डहाणे, पोलीस उप आयुक्त आ.व.सा., गुन्हे, मा. सहा.पोलीस आयुक्त, आ.व.सा., गुन्हे, निलेश मोरे, मा. व.पो.नि. राधिका फडके यांचे मार्गदर्शना खाली पो.उप.नि. रुपाली पवार, पोलीस कर्मचारी- किरण अब्दागिरे, नवनाथ जाधव, आदेश चलवादी, शितल वानखडे, माधुरी डोके यांच्या पथकाने केली आहे.

याद्वारे पुणे शहरातील नागरिकांना आवाहन करण्यात येते की, अशा ऑनलाईन खरेदी – विक्री करणाऱ्या वेबसाईटवरील जहिराती यांची पडताळणी करूनच पैसे जमा करावेत तसेच खात्री केल्याशिवाय स्वतःची वैयक्तिक माहिती देवू नये त्याबाबत योग्य ती खबरदारी घ्यावी. तसेच असा कोणताही प्रकार लक्षात आल्यास जवळचे पोलीस स्टेशनशी अथवा सायबर क्राईम सेल विभागाशी संपर्क साधावा.